**राज्यातील प्रत्येक कुटुंब लखपती करण्याच्या उददेशाने महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत सिंचन विहीरींची कामे गतीने पूर्ण करण्याबाबत SOP (मानक ऑपरेटिंग प्रक्रीया) जिल्हास्तरीय समितीचे पुर्नगठन करणे बाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**नियोजन (रोहयो) विभाग**
**शासन निर्णय क्रमांक-मग्रारो-२०२५/प्र.क्र.१७३/मग्रारो-०१**
**मंत्रालय, मुंबई-४०००३२**
**दिनांक-३०/०३/२०२६**

**संदर्भ-**

१. शासन निर्णय क्र. मग्रारो २०१२/प्र.क्र.३०/ मग्रारो-१, दि. १७ डिसेंबर, २०१२.
२. शासन परिपत्रक क्र. मग्रारोहयो २०१४/प्र.क्र.४५/ मग्रारो-१, दि. २१ऑगस्ट, २०१४.
३. शासन परिपत्रक क्र. मग्रारो २०१८/प्र.क्र.१५५/ मग्रारो-१, दि.२८ ऑगस्ट, २०२०.
४. शासन परिपत्रक क्र. मग्रारो२०१६/प्र.क्र.८५/ मग्रारो-१, दि.४ मार्च, २०२१.
५. मास्टर अॅन्यूअल सर्क्यलर २०२०-२१.
६.केंद्र शासनाचे पत्र क्र. DO # J-११०६०/ ४/ २०१९-RE-VI& (३६६८१९६), दि.४ऑक्टोबर,२०२१
७. शासन निर्णय क्र. मग्रारो २०२१/प्र.क्र.१८२/ मग्रारो-१, दि. ०४ नोव्हेंबर , २०२२.
८. महसुल व वन विभागाकडील शासन निर्णय क्र. कार्याशा २०२५/प्र.क्र.०६, दि.०९ एप्रिल,२०२५.

**प्रस्तावना-**

संदर्भ क्र.०७ नुसार महाराष्ट्र शासनाने मनरेगाच्या योग्य नियोजनातून प्रत्येक कुटुंब लखपती करण्याचे ठरविलेले आहे. महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत सिंचन विहीरींची कामे अनुज्ञेय करण्यात आली आहेत. तसेच सिंचन विहिरीच्या प्रस्तावाबाबत तसेच मंजुरीच्या कार्यवाहीबाबत शासन स्तरावरुन वेळोवेळी मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत. तथापी महाराष्ट्र हे मोठे राज्य असून प्रत्येक भागाची स्थानिक व भौगोलिक परिस्थिती भिन्न आहे. त्यामुळे या राज्यासाठी विहिरीचा एकच आकार किंवा दरनिश्चित करणे शक्य नसल्यामुळे विहिरीच्या कामाशी संबंधित तांत्रिक व आर्थिक बाबी निश्चित करण्यासाठी जिल्हास्तरीय समिती स्थापन करण्यात आलेली असून सदर समिती गरजेप्रमाणे जिल्हयांतर्गत विहिरीचे तांत्रिक, आर्थिक मापदंड व संकल्प चित्राबाबत आवश्यक त्या सूचना निर्गमित करते.

जिल्हास्तरीय समितीची रचना-

| | | |
|---|---|---|
| १) जिल्हाधिकारी तथा जिल्हा कार्यक्रम समन्वयक | - | अध्यक्ष |
| २) मुख्य कार्यकारी अधिकारी तथा सहजिल्हा कार्यक्रम समन्वयक | - | सह अध्यक्ष |
| ३) उपजिल्हाधिकारी (मनरेगा) | - | सदस्य |
| ४ उपमुख्य कार्यकारी अधिकारी /गट विकास अधिकारी (मनरेगा) | - | सदस्य |

५) कृषी विकास अधिकारी (जिल्हा परिषद) - सदस्य
६) भूजल सर्वेक्षण विकास यंत्रणेचा प्रतिनिधी - सदस्य
७) कार्यकारी अभियंता, जलसंधारण (जिल्हा परिषद) - सदस्य सचिव

संदर्भ क्र. ०८ अन्वये मा. विभागीय आयुक्त छत्रपती संभाजीनगर यांचे अध्यक्षतेखालील समितीच्या शिफारशीनुसार राज्यातील प्रत्येक कुटुंब लखपती करण्याच्या उद्देशान महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत सिंचन विहिरींची कामे गतीने पूर्ण करण्यासाठी SOP(मानक ऑपरेटिंग प्रक्रीया) जिल्हास्तरीय समितीचे पुनर्गठण करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय-**

शासन निर्णय दि. ४ नोव्हेंबर, २०२२ नुसार मनरेगा मध्ये सिंचन विहिरींचे कामे अनुज्ञेय करण्यात आली आहेत. या शासन निर्णयान्वये जिल्हास्तरीय समितीचे अध्यक्ष जिल्हाधिकारी आहेत. परंतु जिल्हाधिकारी हे महसूल प्रशासनाचे प्रमुख असून राज्य शासनाच्या सर्व विभागाच्या योजनांचे नियोजन, अंमलबजावणी व आढावा, जिल्हास्तरावरील वेगवेगळया समितीच्या अध्यक्षपदाची जबाबदारी, कायदा व सुव्यवस्था, आपत्ती निवारण, निवडणूका, राजशिष्टाचार, अतिमहत्वाच्या व्यक्तिचे दौरे इत्यादी कामांचा व्याप लक्षात घेता मा. विभागीय आयुक्त छत्रपती संभाजीनगर यांचे अध्यक्षतेखालील समितीच्या शिफारशीनुसार सदर समितीचे अध्यक्ष पद मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद तथा सह जिल्हा कार्यक्रम समन्वयक यांच्याकडे देण्यात येत आहे.

**जिल्हास्तरीय समिती -**

१) मुख्य कार्यकारी अधिकारी (जिल्हा परिषद) - अध्यक्ष
२) उपजिल्हाधिकारी (मनरेगा) - सह अध्यक्ष
३) उपमुख्य कार्यकारी अधिकारी / गट विकास अधिकारी(मनरेगा) - सदस्य
४) कृषी विकास अधिकारी (जिल्हा परिषद) - सदस्य
५) भूजल सर्वेक्षण विकास यंत्रणेचा प्रतिनिधी - सदस्य
६) कार्यकारी अभियंता, जलसंधारण (जिल्हा परिषद) - सदस्य सचिव

उपरोक्त समितीच्या बदलाव्यतिरिक्त संदर्भीय शासन निर्णय क्र. ०७ मधील इतर बाबी कायम राहतील.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२६०३३०१६१०३१३११६ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

VAISHALI GHANSHYAM NAIR

Digitally signed by VAISHALI GHANSHYAM NAIR
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=PLANNING DEPARTMENT, 2.5.4.20=602f9395b1b17add6e2b1d001bb3e97c66556e396b06c5356d89602203dd4aba, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=3A76126ECF51A33E3DDDD56DE7948A269AE78B9203B050C90C67566734C5D778, cn=VAISHALI GHANSHYAM NAIR
Date: 2026.03.30 16:11:22 +05'30'

**(वैशाली नायर)**

**कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन**

**प्रति:-**

१) मा. राज्यपाल यांचे प्रधान सचिव, राजभवन, मुंबई.
२) मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
३) मा. उप मुख्यमंत्री (नगर विकास व सार्व.बांध.) यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
४) मा. उप मुख्यमंत्री ( नियोजन) यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई.

५) मा. मंत्री (रोहयो) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
६) सर्व मा. मंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
७) मुख्य सचिव यांचे सहसचिव, मंत्रालय, मुंबई.
८) अपर मुख्य सचिव (वने) यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई.
९) प्रधान सचिव, मृद व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई.
१०) प्रधान सचिव, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई.
११) प्रधान सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई.
१२) प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
१३) सर्व विभागीय आयुक्त.
१४) आयुक्त, महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना : महाराष्ट्र, नागपूर,
१५) आयुक्त (कृषी), महाराष्ट्र राज्य, पुणे.
१६) संचालक, मृदसंधारण व पाणलोट क्षेत्र व्यवस्थापन, महाराष्ट्र राज्य, पुणे.
१७) संचालक, सामाजिक वनीकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे.
१८) संचालक, कृषि आयुक्तालय, पुणे.
१९) संचालक, रेशीम संचालनालय, नागपूर.
२०) मुख्य अभियंता, लघु पाटबंधारे (स्थानिक स्तर), पुणे.
२१) संचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, पुणे.
२२) सर्व जिल्हाधिकारी (मुंबई शहर व मुंबई उपनगर वगळून).
२३) सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (मुंबई शहर व मुंबई उपनगर वगळून)
२४) सर्व विभागीय कृषि सहसंचालक.
२५) सर्व विभागीय वन अधिकारी/ उप वनसंरक्षक, वने.
२६) सर्व अधीक्षक अभियंता, पाटबंधारे/ सर्व अधीक्षक अभियंता, लघु पाटबंधारे, (स्थानिकस्तर).
२७) सर्व मुख्य अभियंता/अधिक्षक अभियंता/ कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम.
२८) सर्व मुख्य अभियंता/ अधिक्षक अभियंता/ कार्यकारी अभियंता, जलसंपदा.
२९) संचालक, अर्थ व सांख्यिकी संचालनालय, मुंबई.
३०) सर्व जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी,
३२) सर्व जिल्हा जलसंधारण अधिकारी,
३३) सर्व सह/उपायुक्त (विभागीय आयुक्त कार्यालय)
३४) महालेखापाल (लेखापरिक्षा), महाराष्ट्र १ व २, मुंबई व नागपूर.
३५) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र १ व २. मुंबई व नागपूर.
३६) सर्व जिल्हा कोषागार अधिकारी.
३७) सर्व उपजिल्हाधिकारी (रोहयो)
३८) सर्व उप मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (रोहयो)
३९) सर्व सह सचिव/उप सचिव/अवर सचिव व कार्यासन अधिकारी, रोहयो.
४०) सर्व मंत्रालयीन विभाग.
४१) निवडनस्ती, मग्रारो- १.